RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com
ISSN 2582-9173

# महात्मा गांधीना अभिप्रेत शैक्षणिक मूल्यांचा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील अंतर्भाव : एक समीक्षणात्मक अध्ययन

**धम्मप्रकाश श्रीपतराव वैद्य**
अंशकालीन प्राध्यापक
P. G. गांधीवादी विचार विभाग, RTM नागपूर विद्यापीठ, नागपूर.
Email : dhammaprakash1966@gmail.com

---

***सारांश :***

*शिक्षण हे ज्ञान व प्रगतीचे चिन्ह आहे. माणसाच्या उन्नतीचा, उत्कर्षाचा व सामर्थ्यांचा पाया म्हणजे ज्ञान आणि माणसाला ज्ञानाशिवाय तरणोपाय नाही. सामाजिक विकास आणि सामाजिक समानता साध्य करण्यासाठी दर्जेदार शिक्षण हे एक महत्वाचे साधन आहे. शिक्षण मन, वर्तन, आचरण व सहजीवन यांतील मुलभूत अडचणी दूर करून त्यात आवश्यक परिवर्तन घडवून आणते. शोषण विरहीत समाजाची स्थापना करण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्वपूर्ण ठरेल असा महात्मा गांधीचा विश्वास होता. शिक्षणाअभावी स्वस्थ समाजनिर्मिती अशक्य आहे यावर ते ठाम होते. अहिंसक, न्यायपूर्ण, समता व सहकार्याधारित समाज संस्कृती ची निर्मिती व्हावी यासाठी महात्मा गांधी यांनी सेवाग्राम येथे नई तालीम या अभिनव शिक्षण पध्दतीची सुरुवात केली. नई तालीम हे सर्वोदयी व अहिंसक समाजनिर्मितीसाठीचे साधन आहे अशी त्यांची धारणा होती.*

*या शोधपत्रात नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे विश्लेषन गांधीजीच्या नई तालीम आणि शिक्षणावरील विचारांच्या आणि समकालीन भारतात त्यांच्या विचारांच्या प्रासंगिकतेच्या द्रुष्टीकोणातून केले जाईल. शोधपत्रात असे प्रस्तावित केले आहे की नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी मध्ये नई तालीमला एक रोडमॅप म्हणून पाहून आपण एक सशक्त व स्वावलंबी राष्ट्र निर्माण करू शकतो.*

**बीज शब्द :** महात्मा गांधीचे शैक्षणिक मूल्य, नई तालीम, नविन राष्ट्रीय शिक्षण धोरण, बहुआयामी विकास, प्रासंगिकता.

---

**प्रस्तावना :**

शिक्षणातून विद्यार्थ्यांचा मानसिक, भावनिक, बौध्दिक व शारिरीक विकास साधला पाहिजे. विद्यार्थ्यांना दिले जाणारे शिक्षण त्याच्या सामाजिक वातावरणास पोषक असले पाहिजे, त्यातून विद्यार्थ्याला सामाजिक जाणीवेचे भान आले पाहिजे. शिक्षणातून भारतीय संस्कृती जोपासली जावी असे गांधीजीना वाटत होते. शिक्षणात विद्यार्थ्यांच्या कृतीला वाव असावा. शारिरीक अवयवांच्या माध्यमातून बौदिक शिक्षणावर भर दिला जावा.

गांधीजींनी शिक्षणात स्वानुभवाला महत्वाचे स्थान दिले होते. जेवढा जास्त अनुभव विद्यार्थ्यांना घेता येईल तेवढे त्यांचे ज्ञान व्यापक होईल. दशके उलटुनही आजच्या २१ व्या शतकात राष्ट्राच्या शिक्षणाबद्दल आणि त्यांच्या व्यावहारिक पैलू बद्दलचे विचार अजूनही एक महत्वाचे आकर्षनाचे क्षेत्र आहे. नविन राष्ट्रीय शिक्षष धोरणाने आपल्याला देशातील दैनंदिन क्षेत्रात गांधींच्या दृष्टीकोनातील मूल्य शोधण्याची एक उत्तम संधी दिली आहे.

भारतासारख्या लोकशाही देशासाठी शिक्षणावर भर देत गांधीजींनी आपले विचार व्यक्त केले. लोकशाही कार्य करण्यासाठी आवश्यक असलेले तथ्याचे ज्ञान नाही तर योग्य शिक्षन आहे. शिक्षणाला श्रमाची जोड घालून कृतिशील शिक्षण दिले जावे असा त्यांचा विचार होता. परस्परांशी सहकार्य वृत्ति, संयम, सहनशीलता, आदर्श सृजनशीलता, उद्योजकता, सामाजिक जबाबदारी ही कौशल्ये शिक्षणातून विकसित झाली पाहिजेत. विद्यार्थ्यांची सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन अध्यापनाची प्रक्रिया पार पाडली जावी. परिणामी शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सामाजिक आणि भावनिक कौशल्य विकसित होईल याची गांधीजीना खत्री होती. नविन राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या निर्मितीसह नई तालीम सादर करण्याची आणखी एक संधी आली आहे.

**संशोधन लेखाचा उद्देश :**

गांधीजीचे शैक्षणिक मूल्य आणि नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा मधील संबंधाचे विश्लेषण करणे.

**कार्यपद्धती / तथ्य संकलन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी माहिती संकलित करण्यासाठी विषयांशी संबधित ग्रंथ, पुस्तके, लेख व गांधीच्या आत्मकथेचा अवलंब करण्यात आला आहे.

**गृहीतके :**

1) महात्मा गांधीच्या शैक्षणिक मूल्यांचा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यांच्यात महत्वाचे संबंध आहेत.
2) महात्मा गांधीच्या शैक्षणिक मूल्यांचा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर भारतात मूल्यांवर आधारित शिक्षणाला प्रोत्साहन देण्यावर सकारात्मक परिणाम होतो.
3) भारतात अधिक समग्र आणि समावेशक शिक्षण प्रणाली निर्माण होऊ शकेल यासाठी महात्मा गांधींचा शैक्षणिक मूल्यांचा नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण यामध्ये पुरेशा प्रमाणात समाविष्ट आहे.

**नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये गांधीजीच्या शैक्षणिक मूल्यांचा समावेश :**

**1) सर्वांगीण विकास :**

यामध्ये शारिरीक, मानसिक आणि अध्यात्मिक विकासाचा समावेश केला गेला आहे तसेच नैतिक चारित्र्यावर भर दिला गेला आहे.

**2) चारित्र्य आणि मूल्ये :**

यामध्ये नैतिक मूल्य आणि सिद्धांत तसेच सत्य, अहिंसा, समानता यासारख्या मूल्यांचा समावेश केला

गेला आहे.

**3) साधेपणा आणि टिकाऊपणा :**

यामध्ये सोपे आणि सरल शिक्षणाला प्रोत्साहन देणे तसेच शिक्षणाला स्थायी आणि अधिक काळपर्यंत चालणारा बनविणे यांचा समावेश केला गेला आहे.

**4) समावेशकता आणि उपयोगिता :**

सर्व वर्गाच्या आणि समुदायासाठी शिक्षण सोपे आणि सर्वसमावेशक बनविले आणि शिक्षणाला व्यावहारिक आणि सेवेच्या भावनेला प्रोत्साहित याचा समावेश केला आहे.

**5) समुदाय प्रतिबद्धता :**

यात समुदायासोबत शिक्षणाचा विकास करने आणि समुदायाची गरज पूर्ण करणे याचा समावेश केला गेला आहे.

**6) लोकशाही मूल्यांवर भर:**

यामध्ये समानता, न्याय आणि स्वतंत्र्यता यासारख्या मूल्यांना चालना देण्याचा समावेश केला गेला आहे.

**7) मातृभाषा व सांस्कृतिक वारसा :**

मुलांना त्यांच्या मातृभाषेत शिक्षण दिले पाहिजे तसेच त्यांना त्यांच्या सांस्कृतिक वारसाबाबत शिक्षित करणे याचा समावेश केला गेला आहे.

**8) कार्याभिमुखता व स्वावलंबन :**

यामध्ये मुलांना व्यावहारिक आणि उपयोगी शिक्षण देण्यावर भर देणे तसेच मुलांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविणे याचा समावेश केला गेला आहे.

**9) स्त्री शिक्षण:**

सर्व वर्गातील आणि समुदायातील महिलांना शिक्षणाची संधी प्रदान करने आणि त्यांना सशक्त बनविण्यावर जोर दिला गेला आहे.

**10) बालकेंद्रीत शिक्षण:**

यात मुलाची गरज आणि आवड लक्षात घेऊन शिक्षणाला विकसित करने आणि मुलांना स्वयंम शिकणे आणि विकसित करण्याची संधी प्रदान करने यांचा समावेश केला आहे.

**11) व्यावसायिक शिक्षण:**

यामध्ये मुलांना व्यावसायिक आणि उपयोगी शिक्षण देण्यावर भर देने तसेच मुलांमध्ये वेगवेगळे कौशल्य

निर्माण करण्याला विकसित करण्यासाठी संधी देने यांचा समावेश केला आहे.

**12) पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान :**

यामध्ये मुलांना पायाभूत साक्षरतेच्या कौशल्यांना विकसित करण्याची संधी प्रदान करणे आणि त्यांच्यात मुलभूत गणितीय कौशल्य विकसित करण्याची संधी प्रदान करणे यांचा समावेश आहे.

**13) प्रौढ शिक्षण:**

यामध्ये प्रौढ शिक्षणावर विशेष जोर दिल्या गेला आहे ज्यामध्ये प्रौढांना शिक्षण घेण्याची संधी देण्याचा समावेश आहे.

**निष्कर्ष :**

1) महात्मा गांधींनी नई तालीम च्या माध्यमातुन व्यक्तींच्या सर्वांगींन विकासाची गुरुकिल्ली दिली आहे.
2) स्वातंत्र्योत्तर भारतात अनेक शिक्षण धोरणाच्या माध्यमातुन गांधींच्या शिक्षणातुन अपेक्षित परिवर्तनाचा उल्लेख आढळतो.
3) नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण गांधींच्या शैक्षणिक धोरणाशी सुसंगत आढळते.
4) नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये multidisciplinary and interdisciplinary द्रुष्टीकोण मांडला आहे जो सध्याकालीन शैक्षणिक गरजाच्या संबंधीत अधिक प्रासंगिक ठरतो.
5) नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीतून गांधींची नई तालीम मधुन अपेक्षित नवसमाज निर्माण वृत्ती उदयास येऊ शकते.

**समारोप :**

महात्मा गांधी यांनी 3H हा विचार मांडला. अर्थात Head, Hand आणि Heart यांचे शिक्षण त्यांना दिले जावे तरच मुले स्वावलंबी होतील. शिक्षणाच्या संदर्भात महात्मा गांधी असे म्हणत बुद्धी, हृदय आणि आत्मा यांचा संगम म्हणजे शिक्षण होय. गांधीच्या शिक्षा व्यवस्थेत मेंदू बरोबर हाताला काम देण्याची महत्वपूर्ण संकल्पना होती. मेकॉलेच्या शिक्षणपध्दतीने ती मोडीत काढली. शिक्षणाचे गुन्हेगारीकरण वाढत गेले अशा वेळी गांधीजीचे शैक्षणिक मूल्य तन मन धन यापासुन स्वीकारले पाहिजे. गांधीच्या मते शिक्षणात व्यावसायिक स्वरूपाचा अंतर्भाव असने आवश्यक आहे. वर्तमान गांधीजीचा विचार डोळ्यासमोर ठेऊन भूमिका घेऊ लागले. गेले काही वर्षे कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार कार्यानुभव विषय आपण अंतर्भूत केला. मात्र शिक्षण याचा अर्थ बौद्धिक विकास इतकाच घेतला गेला. आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ६ वी पासूनच व्यवसाय शिक्षणाचा विचार केला गेला आहे. याचा अर्थ गांधीनी सूचविलेल्या शिक्षण व्यवस्थेत किती महत्वाचा विचार समाविष्ट होतो हे आपल्या लक्षात येईल.

**संदर्भ ग्रंथ :**

- अकोलकर ग.वि. (संपादक), गांधी विचारदर्शन शिक्षण विचार, प्रकाशक बाळासाहेब भारदे,अध्यक्ष

महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, गांधी भवन कोथरूड पुणे.

- राम शेवाळकर (संपादक), शिक्षण विचार, विनोबा ग्रामसेवक मंडळ वर्धा आवृत्ती बारावी ऑगस्ट 2011
- त्रिलोकीनाथ चतुर्वेदी (संपादक), साहित्य अमृत, नवी दिल्ली, जानेवारी २०२०.
- मो. क. गांधी - सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदीर, अहमदाबाद.
- वाकचौरे संदीप - नवीन शैक्षणिक धोरण स्वरुप, संधी व आव्हाने, शोध निबंध.
- नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020), शिक्षण मंत्रालय, भारत सरकार.